## महत्वाचे

### कोपरगाव विधानसभा खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर

**राहाता (प्रतिनिधी)–** कोपरगाव विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निवडणूक खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके यांनी दिली. कोपरगाव विधानसभेत प्रथम तपासणी १० नोव्हेंबर, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर व तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते ६.०० वाजे दरम्यान होणार आहे. उमेदवारांनी तपासणी वेळी निवडणूक खर्च नोंदवही करून, एबीसी परिपूर्ण करून, दैनंदिन खर्च नोंदवही रजिस्टरमधील जमा व खर्च बिलांच्या सत्यप्रती व उमेदवारांचे बँक खाते स्टेटमेंटसह उमेदवार स्वतः किंवा उमेदवारांच्या प्राधिकृत प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे. उमेदवार खर्च तपासणी पथकात सहायक खर्च निरीक्षक मिल्टन सरकार, उपकोषागार अधिकारी ज्योती सैद, लेखाधिकारी गणेश सोनवणे, लेखा परीक्षक एस.बी. क्षीरसागर, लेखा लिपीक अजय पाटील काम करीत आहेत.

# पश्चिमेकडील पाणी वळवून गोदावरी खोऱ्यातील तूट भरुन काढणार- खा. तटकरे

## आ. कानडे हेच महायुतीचे उमेदवार- ना. विखे पाटील : गोंधवणी महादेव मंदिरात कानडेंचा प्रचार शुभारंभ

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळवून गोदावरी खोऱ्यातील तूट भरून काढणार असल्याचे, प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी केले. तर आमदार लहू कानडे हेच महायुतीचे उमेदवार असल्याचे सांगत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आ. कानडे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले.

विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे उमेदवार आमदार लहू कानडे यांचा प्रचार नारळ शुभारंभ पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते व खा. तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली भैरवनाथनगर (गोंधवणी) येथील महादेव मंदिराच्या प्रांगणात झाला. त्यावेळी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार आ. लहू कानडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव व प्रवक्ते अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक, भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे, माजी सभापती इंद्रनाथ थोरात, माजी सभापती नानासाहेब पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे, अमृत धुमाळ, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद नवले, नितीन दिनकर आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

खा. तटकरे म्हणाले, शेतीचा, सहकाराचा जिल्हा म्हणून अहिल्यानगरची ओळख आहे. जिल्ह्याच्या पाणी प्रश्नासाठी पालकमंत्री विखे पाटील यांच्या मागणीनुसार पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळवले जाईल. कारण २०० ते ३०० टीमसी पाणी समुद्राला जाते, ते वळविण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. राज्यातील महायुती सरकारने कांदा निर्यातबंदी उठवली, साखरेचे धोरण घेतले, वीज बिल माफी केली, लाडकी बहिण योजना आणली, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याला आर्थिक शिस्त लावल्याचे सांगत ते म्हणाले, स्वर्गीय गोविंदराव आदिक यांनी मतदारसंघात मोठी विकास कामे केली. त्यांच्या रूपाने सुसंस्कृत नेतृत्व तालुक्याने अनुभवले. श्रीरामपूर मधील जनता सुसंस्कृत आहे. आ.कानडे यांच्या रूपाने तालुक्याला समंजसपणाचे नेतृत्व दिले आहे. विखे पाटील यांनी मनावर घेतले तर कानडे तुम्ही आमदार झाला. त्यांनी मनावर घेतले म्हणून मी येथे आलो. त्यामुळे तुम्ही मोठ्या मताधिक्क्याने विधानसभेत जाणार असल्याचे खा. तटकरे म्हणाले.



> माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांना उद्देशून, तुम्ही माघारीच्या दिवशी नॉट रिचेबल होता. आता रिचेबल आहात. तुम्हाला जाहीर सांगतो की, महायुतीचे उमेदवार लहू कानडे हेच आहेत. तुम्हाला आमचा पाठिंबा नाही, तुम्ही विश्वासघात केला, त्यामुळे क्षमा नाही, असे पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

ना. विखे पाटील म्हणाले, आ. कानडे यांची जबाबदारी आपली आहे. त्यांना प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. त्याचा उपयोग त्यांनी निष्ठेने विकास कामांसाठी केला. आ. कानडे हेच महायुतीचे उमेदवार असून श्रीरामपूर तालुक्यातील जनता काँग्रेसचे भूत गाडल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे ते म्हणाले.

आ. कानडे म्हणाले, आपले तिकीट कापले जाईल, हिरवळीतील साप या पद्धतीने चावतील, असे स्वप्नातही वाटले नव्हते. एवढा विश्वासघातकी अनुभव कोणाच्या वाट्याला येऊ नये. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री विखे पाटील, खासदार तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आपल्याला उमेदवारी दिली. कपटनीतीच्या माणसापासून दूर झालो, झाले ते बरच झालं, असे ते म्हणाले. अविनाश आदिक म्हणाले, आ.कानडे यांनी सन्मानपूर्वक वागणूक दिल्याचे तसेच तालुक्यात महायुतीसाठी पोषक वातावरण असल्याचे सांगितले.

यावेळी कैलास बोर्डे, माजी नगरसेवक राजेंद्र पवार, निलेश भालेराव यांची भाषणे झाली. भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे यांनी आभार मानले.

यावेळी अशोक कारखान्याचे माजी संचालक प्रा. कार्लस साठे, पोपटराव जाधव, बाळासाहेब मुंगसे, उद्योजक अंकुश कानडे, बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे, जि. प. चे माजी अध्यक्ष मिस्टर शेलार, नानासाहेब शिंदे, शिवाजी गांगुर्डे, माजी नगरसेवक रवींद्र गुलाटी, राजेश अलग, मोहम्मद शेख, सलीम शेख, मुख्तार शहा, प्रकाश ढोकणे, विजय शेळके, मल्लू शिंदे, अल्तमश पटेल, जितेंद्र छाजेड, अशोक कानडे, गौतम उपाध्ये, केतन खोरे, शामराव निमसे, विनोद कोतकर, राधाकृष्ण आहेर, सतीश बोर्डे, सचिन जगताप, विष्णूपंत खंडागळे, राजेंद्र कोकणे, सुरेश पवार, दीपक निंबाळकर, दीपक कदम, विजय शेलार, अशोक भोसले, सागर मुठे, अमोल कदम, हरिभाऊ बनसोडे, बाबासाहेब कोळसे, सुरेश पवार, आबा पवार, नानासाहेब रेवाळे, विष्णुपंत बडाख, रमेश उंडे, रवींद्र मुरकुटे, विजय दवंगे, पी. एस. निकम, रवी गायकवाड, सचिन ब्राह्मणे, सुभाष त्रिभुवन, भीमा बागुल, अजय खिलारी, अनिल बिडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य प्रतिनिधी विश्वनाथ आवटी, सुनील थोरात, किशोर पाटील बकाल, साजिद मिर्झा, अभिजीत लिप्टे, श्रीकांत दळे, भागचंद औताडे, सुधाकर बोंबले, सैफ शेख, माजी नगरसेवक नजीर मुलानी, ॲड. संदीप चोरगे, तौफिक शेख, सागर कुऱ्हाडे, अर्चना पानसरे, वनिता खोसरे, सुप्रिया धुमाळ, मंगल व्यवहारे, मंदाताई गवारे, प्रियंका जनवेजा, रुबीना पठाण यांच्यासह श्रीरामपूर शहर तालुका व राहुरी तालुक्यातील ३२ गावांतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दानवे व ना. विखे यांची आज वांबोरीत जाहीर सभा



**उंबरे (वार्ताहर)–** राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपा व महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारार्थ मा.खा.रावसाहेब दानवे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची जाहीर सभा वांबोरी येथे आज शनिवार दि. ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून अध्यक्षस्थान ज्येष्ठ नेते ॲड.सुभाषराव पाटील हे भूषविणार आहेत, अशी माहिती भाजपा तालुकाध्यक्ष सुरेशराव बानकर यांनी दिली आहे.

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, लहुजी सेना आदी महायुतीच्या घटक पक्षांमधील सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बानकर यांनी केले आहे.

## फ्लेक्स फाडले तरी जनमत बदलणार नाही- अमोल भनगडे




**उंबरे (वार्ताहर)–** फ्लेक्स बोर्ड फाडले तरी, आता राहुरी विधानसभा मतदारसंघातील जनतेने भाजपा महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांना निवडून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे जनमत बदलणार नाही, विरोधकांनी पातळी सोडू नये, असा इशारा भाजपा विधानसभा मतदारसंघाचे संयोजक अमोल भनगडे यांनी दिला आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचाराचा सोनगाव, सात्रळ परीसरात फ्लेक्स बोर्ड अज्ञातांनी फाडला. या घटनेचा निषेध व्यक्त करताना संयोजक अमोल भनगडे यांनी सांगितले, काही विरोधकांना पराभव दिसत असल्याने अशा प्रकारे पातळी सोडून फ्लेक्स बोर्ड फाडण्याचा प्रकार सुरू झाला आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांना प्रचाराचा अधिकार आहे, परंतु, संबंधित अज्ञातांची पायाखालची जमीन घसरल्याने असे प्रकार सुरू झाले आहेत. संबंधित घटनेचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत असून संबंधितावर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे, असे भनगडे यांनी सांगितले.

## महायुती सरकारने महिलांचा सन्मान केला- धनश्री विखे

### साकुरीत गावभेट संवाद दौरा



**राहाता (प्रतिनिधी)–** महिलांना सन्मान देण्याचे काम महायुती सरकारच्या माध्यमातून होत आहे. लाडकी बहीण योजने बरोबरच एस.टी प्रवासाला ५० टक्के सवलत देत महिलांचा खऱ्याअर्थाने सन्मान झाला. यामुळे लाडक्या बहिणी सदैव महायुतीमधील सर्व भावांच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या आहेत, असा विश्वास रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्री विखे पाटील यांनी केले.

शिर्डी मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रचारार्थ साकुरी गावातील महिलांच्या भेटीगाठी घेऊन त्यांनी महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू करून महिलांना सक्षम करण्याचे काम सुरू केले आहे. महिलांची प्रगती झाली तर, कुटुंबाची होती आणि समाज पुढे जाण्यासही मदत होते. त्यामुळेच राज्य सरकारने महिलांच्या विकासाकरिता अनेक योजना जाहीर केल्या. बस प्रवासामध्ये पन्नास टक्के सूट, विद्यार्थिनींना मोफत शिक्षण आणि बचत गटांच्या चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी लखपती दिदी योजना सुरू केली असल्याची माहितीही त्यांनी याप्रसंगी दिली.

ना. विखे पाटील यांच्या माध्यमातून शिर्डी मतदार संघाच्या विकास प्रक्रियेला मोठी गती मिळत असून, मतदार संघात पायाभूत सुविधाही उपलब्ध झाल्याने नागरिकांनाही त्याचा मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं काम कार्यकर्त्यांच्या माध्यमातून झाले आहे. येणाऱ्या काळात ना. विखे पाटील यांना पाठबळ देवून त्यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणावे, असे आवाहन सौ. विखे पाटील यांनी केले.

## बेगडी प्रेम जनतेला चांगलेच समजले- चाचा तनपुरे



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** जिल्हा बँक ताब्यात असतानाही राहुरीच्या डॉ. तनपुरे कारखान्यावर जप्ती व भाडेतत्वावर देणाचे षडयंत्र करून कारखाना कायमस्वरूपी बंद पाडण्याचे प्रयत्न करणारे आता विधानसभा निवडणुकीत डॉ. तनपुरे कारखाना पुन्हा सुरू करण्याच्या राहुरीतील जनतेला भूलथापा देत आहेत. त्यांच्या वल्गना म्हणजे 'सौ चुहें खाकर बिल्ली हज चली....' असा प्रकार असल्याची टीका विकास मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब चाचा तनपुरे यांनी माजी आ. शिवाजी कर्डिलेंवर केली आहे.

रावसाहेब चाचा तनपुरे म्हणाले, राहुरीचा डॉ. तनपुरे कारखाना अडचणीत आणण्यासाठी त्यांनी केलेला खटाटोप राहुरीच्या जनतेला माहीत आहे. कारखान्याच्या गेल्या निवडणुकीत सभासद व कामगार यांनी आपली कामधेनू सुरू होऊन पुन्हा चांगले दिवस येतील म्हणून कारखाना यांच्या ताब्यात दिला. मात्र, हा कारखाना फक्त दोनच गळीत हंगामांत सुरू होता. आम्हीही हा कारखाना सुरू व्हावा, या प्रामाणिक हेतूने विकास मंडळ म्हणून साथ दिली. कारखाना सुरू करण्याच्या नावाखाली सभासद व कामगार यांना खोटी आश्वासने देऊन राजकीय पोळी भाजून घेतली. जर त्यांना राहुरी कारखान्याच्या कामगार व सभासदांचा कळवळा होता तर त्यांनी कारखान्यावर प्रशासक आणला नसता. गेल्या पाच वर्षापासून असलेल्या कारखान्यावरील संचालक मंडळाला तुमची साथ होती. आपल्या संचालक मंडळाने कारखान्याच्या संलग्न संस्थाचेही वाटोळे केले. कारखान्याच्या मालकीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जमिनीही आपल्याच बगलबच्चांना विकल्या. कारखान्याची सामुग्री भंगार म्हणून मातीमोल भावात विकली. खंडाईत यांना हटवून आपल्या मर्जीतील डीडीआर प्रशासक म्हणून बसवून कारखान्याबाबतच्या डीआरटी न्यायालयात सुरू असलेल्या केसेस कोणी? का? काढून घेतल्या हे राहुरीच्या सुज्ञ जनतेला माहीत आहे. कारखाना बचाव कृती समितीच्या न्यायालयीन लढाईने आता कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक होणार आहे. निवडून आलेले संचालक मंडळ निर्णय घेईल. राहुरीतील जनता आता सुज्ञ झाली असून बाहेरील 'पुतणा मावशीचे प्रेम' आम्हाला चांगलेच समजले असल्याचा टोला त्यांनी लगावला.

## तालुक्यातील सर्व बसस्थानकाजवळ नो-पार्कींग फलक लावण्याची मागणी



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** नेवासा तालुक्याच्या हद्दीतील सर्व राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावर असणाऱ्या सर्वच बस स्थानक व बस थांब्याजवळ १०० मीटर अंतर नो-पार्कींग फलक तातडीने लावण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे कारभारी गरड यांनी रस्ता सुरक्षा समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे केली.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात श्री. गरड यांनी म्हटले आहे की, नेवासा तालुक्यातून जाणाऱ्या नेवासा-शेवगाव, नेवासा-श्रीरामपूर, पांढरीपुल-घोडेगाव-वडाळा-प्रवरासंगम, कुकाणा-चांदा-घोडेगाव-सोनई-राहुरी, नेवासा-खडका फाटा-सलाबतपुर-शिरसगाव-वरखेड, कुकाणा-गेवराई-शिरसगाव यासह इतर मार्गावरील बस थांबे आणि बस स्थानकालगतच खाजगी अवैध वाहतुकीची सर्व वाहने सर्रास उभी असतात.

तिथेच प्रवासी भरणे व उतरविण्याचे काम चालू असल्याने एसटीला तेथे थांबण्यास अडथळा निर्माण होतो. अशा ठिकाणी बस थांबू शकत नसल्याने एकतर थांब्यापासुन लांब मागे किंवा पुढे उभी राहते. त्यामुळे प्रवाशांना पळत जावे लागते. वृध्द, रुग्ण, अपंग यांची दमछाक होते. किंवा बस थांबलीच तर ती मध्ये रस्त्यावरच उभी राहिल्याने इतर सर्व प्रकारच्या वाहतुकीस अडथळा येतो. मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. ही समस्या नेवासा, भेंडा, कुकाणा, सलाबतपुर, शिरसगाव, घोडेगाव, वडाळा, प्रवारासंगम, चांदा, सोनई या गावातील प्रवासी, वाहनचालक व नागरिकांना सतत जाणवते. अवैध प्रवासी वाहन चालकास कुणी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तर ते अरेरावी करतात. नो-पार्कींग फलकाबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याशी संपर्क केला असता व्यवस्थित सांगितले जात नाही. पोलीस खात्याशी संपर्क केला तर सर्व ठिकाणी वाहतुक पोलीस नाहीत, अवैध वाहनांवर कारवाई करु असे, सांगितले जाते. मात्र, आमच्या बस चालकांना त्रास सहन करावा लागतो, असे वाहतुक नियंत्रक म्हणतात.

त्यामुळे रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांनीच या महत्वपुर्ण समस्येत तातडीने लक्ष घालून जिल्ह्यात सर्वत्र नोपार्कींग फलक लावण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत, अशी मागणी अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कारभारी गरड यांनी केली आहे.

## आमदार थोरातांनी गावोगावी विकास योजना राबवल्या- डॉ. तांबे

### प्रचारार्थ ग्रामीण भागातील नागरिकांशी संवाद



**संगमनेर (प्रतिनिधी)–** सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेल्या शिस्तीवर संगमनेरचा सहकार कार्यरत असून यामुळे तालुक्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत तर झाली. पण राज्यामध्ये संगमनेरचा लौकिक निर्माण झाला. निळवंडे धरण व कालवे पूर्ण करून जनतेला पाणी देण्याबरोबरच आमदार बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने गावोगावी विकासाच्या योजना राबवल्या असल्याचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी सांगितले.

तालुक्यातील संगमनेर खुर्द, जाखुरी, अंभोरे, पिंपरणे आदी गावांमध्ये आमदार बाळासाहेब थोरात यांच्या प्रचारार्थ नागरिकांच्या भेटीगाठी दरम्यान ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, संगमनेर तालुक्याला सुसंस्कृत राजकारणाचा वारसा आहे आणि ही परंपरा आमदार बाळासाहेब थोरात यांनी पुढे चालविली आहे. त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. सर्व समाजाला बरोबर घेतले. रात्रंदिवस काम करणाऱ्या या नेतृत्वाने संगमनेरचा राज्य पातळीवर गौरव वाढवला.

निळवंडे धरण जीवनाचे ध्यास मानून धरणासह कालवे पूर्ण केले आणि मागील वर्षी दुष्काळी भागातील जनतेच्या शेतात पाणी आले. कोरोना संकटात सर्व जग बंद होते. फक्त दवाखान्यांच्या सोबत आपल्या निळवंडे धरणाचे कालवे सुरू होते आणि अशा संकट काळातही आमदार थोरात दररोज या कालव्यांचा आढावा घेत होते. डाव्या आणि उजव्या कालव्याचे काम पूर्ण व्हावे याकरीता १०० फूट उंचीवर जाऊन त्यांनी पाहणी केली. पक्ष फोडाफोडी करून राज्यात सत्तांतर झाले आणि ज्यांनी या कामांमध्ये अडचणी निर्माण केल्या त्या लोकांनी उद्घाटन केले, परंतु ते जनतेला मान्य झाले नाही. पाणी आले याचे गावोगावी आनंदाने स्वागत झाले आणि लोकांनी जलनायक उपाधीने आमदार थोरात यांना गौरवले. भाजपा हा खोटारडा पक्ष आहे. भाजपने अनेकवेळा जनतेला फसवले आहे. पक्ष बदलणाऱ्यांनी पक्षनिष्ठेबद्दल काय बोलावे. इतके रसातळाला गेलेले राजकारण कधीही महाराष्ट्राने पाहिले नाही, अशी टीका करताना आमदार थोरात यांना राज्यातून सर्वाधिक मतांनी सर्वांनी निवडून देण्यासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## शहरात संशयित वाहनांची झाडाझडती

**सिन्नर (प्रतिनिधी)–** सिन्नर पोलिसांकडून शहरात संशयित वाटणाऱ्या वाहनांची झाडाझडती घेण्यात आली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दारु, पैसे, भेटवस्तूंची वाहतूक होवू नये. निवडणुका निकोप वातावरणात व्हाव्यात या हेतूने ही तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. १२० वाहनांची तपासणी यात झाली तर २५ हून अधिक बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

आडवा फाटा, बसस्थानक, संगमनेर नाका, वावीवेस या परिसरात ही मोहीम राबवण्यात आली.

ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपअधीक्षक डॉ. नीलेश पालवे यांच्या सूचनेनुसार निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम हाती घेण्यात आली. गायकवाड यांच्यासह उपनिरीक्षक टकले, हवालदार रवींद्र चिने, गणेश वराडे, साई नागरे, दोंदे यांनी तपासणी मोहिमेत भाग घेतला.

## राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार

### आ. पंकजा मुंडे : फेक नेरॅटिव्हला बळी पडू नका



**करंजी (वार्ताहर)–** राज्यात आगामी निवडणुकीत भाजप महायुतीचे सरकार येणार हे निश्चित आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले हे आमच्यासाठी लकी आहेत. ते राजकारणातील एक नंबरचे पैलवान आहेत. यंदा शंभर टक्के निवडून येणार असून सरकारही आपलेच असणार आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आ.पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

जिल्हा बँकेचे चेअरमन राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारार्थ आ. पंकजा मुंडे यांनी शिराळ चिचोंडी येथे जाहीर सभा घेतली. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. सुजय विखे होते.

भाजप नेत्या आ. मुंडे म्हणाल्या, लोकसभा निवडणुकीमध्ये माझा व डॉ. सुजय विखे पाटील यांचा पराभव फेक नेरॅटिव्हमुळे झाला. देशात नरेंद्र मोदींचे सरकार असून महाराष्ट्रात देखील महायुतीचे सरकार आणायचे आहे. लाडकी बहीण योजना अशीच सुरू राहण्यासाठी नगर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांना मतदान करा. शेतकऱ्यांना मोफत वीज, तरुणांसाठी शैक्षणिक अनुदान, महिलांसाठी एसटीमध्ये अर्धे तिकीट अशा अनेक योजना महायुती सरकारने राबवल्या आहेत. विरोधकांना चांगले सरकार चालवता येत नाही. नगर जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी माझी आहे. म्हणून माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्यासारख्या हुशार पैलवानाला निवडून द्या. जनतेसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाला माझ्याबरोबर विधानसभेत पाठवा. स्व. गोपीनाथ मुंडे हे आमदार, खासदार बनवणारी फॅक्टरी होती. विरोधक संविधान, जातियवाद यावर अफवा पसरवतात या गोष्टीवर विश्वास न ठेवता विकासाच्या कामाला मतदान करा, असे आवाहन आ. पंकजा मुंडे यांनी केले.

कर्डिले म्हणाले, मी आमदार नसताना पाच वर्षे मतदारसंघातील जनतेच्या संपर्कात राहिलो. विकास कामे देखील महायुती सरकार व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून केली. माझ्या कामामुळे व जनसंपर्कामुळे एवढा मोठा जनसमुदाय समोर उपस्थित आहे.त्यामुळे विजयाची खात्री आहे.

डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले, कामाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व महायुतीचे उमेदवार निवडून येतील. यावेळी मतदार संघाचे प्रभारी महेंद्रभाई पटेल, आ. मोनिकाताई राजळे, श्रीगोंद्यातील भाजपचे उमेदवार विक्रम पाचपुते, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगराध्यक्ष सत्यजित कदम, माजी जिल्हा परिषद सदस्य धनराज गाडे, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, युवा नेते अक्षय कर्डिले, बाबूशेठ टायरवाले, राजू शेटे, नामदेव ढोकणे, काशिनाथ लवांडे, भाऊसाहेब बोठे, रभाजी सूळ, पुरूषोत्तम आठरे, शिवाजी पालवे, एकनाथ आटकर,वैभव खलाटे, बाबा राजगुरू, विलास गजभिव, सुरेश बानकर, सिमाताई ठोंबरे, अशोक सावंत, डॉ. मृत्युंजय गर्जे, दिलीप जठार आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.